महाराष्ट्र शासन
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र.** ०२०-२६१२२६०३/२६१२२०७६ **EmailID:ditpvd.pune@maharashtra.gov.in**
**ddtp.ho@maharashtra.gov.in** **do_tpv2@rediffmail.com**

जा.क्र.डीटीपी/१११३/३०२४/कलम ४९/टिपीव्ही-२/3429 दि.05 .०७.२०२४.

प्रति,

परिक्षीत कपील निखाडे तर्फे
श्रीमती अश्विनी कपिल निखाडे
रा. नांदोरी रोड, संत तुकडोजी वॉर्ड,
हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जि. वर्धा ४४२३०१.

**विषयः-** **विकास योजना सिंदी रेल्वे जि. वर्धा.**
मौ. पिंपळगाव (मा.) ता. हिंगणघाट, जि. वर्धा, स.क्र. २१९/१/ब, आ.क्र. ७६ "बगीचा", १२ मी. रुंद वि.यो. रस्ता व २४ मी. रुंद वि.यो. रस्ता बाबत. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४९(१) चे तरतुदी अन्वयेची खरेदी सूचना...

**संदर्भः-** परिक्षीत कपील निखाडे तर्फे श्रीमती अश्विनी कपिल निखाडे यांनी ॲड. आर. एल. सुटे यांचे मार्फत दि. १८.०१.२०२४ रोजी बजावलेली खरेदी सूचना (संचालनालयास प्राप्त दि. २४.०१.२०२४)

महोदय,

विषयांकित खरेदी सूचनेच्या अनुषंगाने संचालनालयाने दि. ०५.०७.२०२४.रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

सहपत्रेः- वरीलप्रमाणे
(मा.संचालक, न.र. यांचे मान्यतेने.)

आपला,

**(सुदर्शन सि. गाडळकर)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

**प्रत निर्णयाच्या प्रतीसह माहितीस्तव सादरः-**

१. मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, (नवि-०९), मंत्रालय, मुंबई यांना सादर.
२. सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.

(कृ.मा.प.)

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेसमोर**
**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४९ अंतर्गत**
**खरेदी सूचनेबाबत निर्णय**

हिंगणघाट शहराची (सुधारीत+वाढीव) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे 'उक्त अधिनियम' असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) चे तरतुदीन्वये शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. अधिसूचना क्र. टिपीएस-२९०५ / ३२४८ / प्र.क्र.-१२१ (ए) / ०५ / नवि-९, दि.२६.०४.२००६, अन्वये मंजूर केली असून, ती दि.१५.०६.२००६ पासून अंमलात आलेली आहे.

हिंगणघाट शहराचे मंजूर विकास योजनेनुसार (सु.+वा.) मौ. पिंपळगाव (मा.) जि. वर्धा येथील स.क्र. २१९ या जमिनीचे क्षेत्र आ.क्र. ७६ "बगिचा" या आरक्षणाने तसेच १२ मी. व २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित होत असून भागशः क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट आहे. सदर क्षेत्रापैकी स.क्र. २१९/१ब, क्षेत्र १.०० हे. या जमिनीचे उक्त नमूद प्रमाणेच्या आ.क्र. ७६ "बगिचा" या आरक्षणाने व १२ मी. व २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्राबाबत श्री.परीक्षीत कपील निखाडे यांनी, ॲड. आर. एल. सुटे, यांचेमार्फत उक्त अधिनियमाचे कलम ४९ चे तरतुदीन्वये संचालनालयावर दि. १८.०१.२०२४ रोजी खरेदी सूचना बजावलेली आहे. (संचालनालयास प्राप्त दि.२४.०१.२०२४). उक्त आरक्षणाच्या भूसंपादन व विकासासाठी 'हिंगणघाट नगर परिषद' हे समुचित प्राधिकरण आहे.

सदर सूचनेच्या अनुषंगाने सुनावणी दि. १७.०५.२०२४ रोजी सुनावणी ऑनलाईन पध्दतीने (Google Meet) व्दारे आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अर्जदारांचे वतीने त्यांचे वकील, मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगणघाट, व सहायक संचालक, नगर रचना, वर्धा शाखा हे उपस्थित होते.

उक्त कलम-४९ चे तरतुदीन्वये प्राप्त खरेदी सूचना विचारात घेऊन सर्व संबंधित कार्यालयांनी उपस्थित केलेले मुद्दे, कागदपत्रे, अहवाल इ. पाहता, पुढील बाबी निदर्शनास येत आहेतः-

**निरीक्षणे**

१. अर्जदार सूचनाकर्ते श्री.परीक्षीत कपील निखाडे यांनी व त्यांचेवतीने ॲड. आर.एल. सुटे यांनी, उक्त अधिनियमाच्या कलम-४९ चे तरतुदीन्वये संचालनालयास

दि.१८.०१.२०२४ रोजी बजावलेली खरेदी सूचना संचालनालयास दि.२४.०१.२०२४ रोजी प्राप्त झालेली आहे.

२. दि. १८.०१.२०२४ रोजीच्या सूचनेच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, नगर परिषद, हिंगणघाट यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, अर्जदार श्री. परिक्षीत कपील निखाडे यांनी नगर परिषदेकडे विषयांकीत जागा स.नं. २१९/१ब या जमिनीचे क्षेत्राबाबत विकसन परवानगीकरीता अर्ज सादर केला नसल्याचे नमूद आहे. त्यामुळे उक्त अधिनियमाचे कलम-४९(१)(ड) व कलम-४९(२)च्या तरतु दीन्वयेची पूर्तता होत नाही.

३. विषयांकित खरेदी सूचनेसोबत ॲड.आर.एल.सुटे यांनी स.क्र.२१९/१ या जमिनीचा मोजणी नकाशा व स.क्र.२१९/१/ब या जमिनीचा ७/१२ उतारा सादर केला आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यानुसारच्या स.क्र.२१९/१/ब या जमिनीच्या चतु:सिमाबाबत सादर केलेल्या स.क्र. २१९/१ या जमिनीच्या मोजणी नकाशावरून स्पष्टता होत नाही. त्यामुळे, अर्जदार सूचनाकर्ते यांची जागा सदर आरक्षणाने बाधित होते किंवा कसे? तसेच, बाधित होत असल्यास आरक्षणामुळे बाधित होत असलेले नेमके क्षेत्र किती? याची शहानिशा करता येत नाही.

४. तसेच, यापुर्वी अर्जदार सूचनाकर्ते यांनी दि. ०५.०८.२०२० रोजी विषयांकीत जमिनीबाबत उक्त अधिनियमाच्या कलम-४९ चे तरतुदीन्वये शासनास, संचालनालयास व नगर परिषदेस बजावलेली खरेदी सूचना संचालनालयाचे पत्र क्र. ८१०, दि. १०.०२.२०२१ अन्वये वरील मुद्दा क्र. २ व ३ चे अनुषंगाने फेटाळण्यात आली आहे.

५. यापुर्वीच्या सूचनाकर्ते यांनी दि. ०५.०८.२०२० रोजी बजावलेल्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने, संचालनालयाने पारित केलेल्या निर्णयानंतर वस्तुस्थितीमध्ये काही बदल झाला असल्याचे निदर्शनास येत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी वरील मुद्दा क्र.२, ३, ४ व ५ विचारात घेता, उक्त अधिनियमाच्या कलम-४९(१)(ड) व ४९(२) मधील तरतूदीं विचारात घेता, प्रस्तुतची खरेदी सूचना वैध नाही.

## निष्कर्ष

सबब, उपरोक्त बाबी विचारात घेता, मौ. हिंगणघाट, येथील स.क्र. २१९/१ब या जमिनीवरील मंजूर विकास योजनेनुसारच्या आ.क्र. ७६ "बगिचा" , या आरक्षणाने तसचे १२ मी. व २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्राबाबत अर्जदार खरेदी सूचनाकर्ते यांनी हिंगणघाट नगर परिषदेकडे विकसन परवानगीकरीता अर्ज सादर केला नाही. तसेच, खरेदी सूचनाकर्ते यांनी

सूचनेसोबत स.क्र. २१९/१ या जमिनीचा मोजणी नकाशा सादर केला असल्यामुळे, त्यावरून सूचनेंतर्गतच्या स.क्र.२१९/१/ब या जमिनीच्या चतु:सिमाबाबत स्पष्टता होत नाही. त्यामुळे, जमिनधारक खरेदीसूचनांतर्गत जागेच्या किफायतशीर वापरापासून वंचित झाल्याचा निष्कर्ष निघू शकत नाही.

राज्यातील अ, ब व क वर्ग नगर परिषदांकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४९ चे तरतुदीन्वये बजावलेल्या खरेदी सूचनेबाबत उक्त अधिनियमाचे कलम ४९(४) चे तरतुदीन्वये निर्णय घेण्याविषयी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये प्राप्त अधिकारात मी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे पुढीलप्रमाणे निर्णय पारित करीत आहेः-

**निर्णय**

खरेदी सूचनाकर्ते यांनी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४९(१) चे तरतुदीन्वये हिंगणघाट शहराच्या मंजूर विकास योजनेमधील आ.क्र. ७६ "बगिचा", १२ मी. व २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित होणाऱ्या मौ. हिंगणघाट येथील स.क्र. २१९/१ब, १.० हेक्टर क्षेत्राबाबत संचालनालयावर दि.१८.०१.२०२४ रोजी बजावलेली परंतू संचालनालयास दि. २४.०१.२०२४ रोजी प्राप्त झालेली खरेदी सूचना उक्त अधिनियमाच्या कलम ४९(४) चे तरतुदीन्वये फेटाळण्यात येत आहे.

(नगर रचना आणि मूल्य निर्धारण विभाग, संचालक, नगर रचना, सत्यमेव जयते, महाराष्ट्र शासन, पुणे)

(अविनाश भो. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**जा.क्र.**डीटीपी/१११३/३०२४/कलम ४९/टिपीव्ही-२/३५८९
मध्यवर्ती कार्यालय, पुणे.
दिनांक-०५ .०७.२०२४